# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण

कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११


जा.क्र. : काओसंवि /ब/क्रीडा/क्रीडा गणवेश भत्ता/ No 10743 दिनांक : - 9 APR 2010

## परिपत्रक

विषय : अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महावितरण कंपनीतील खेळाडू कर्मचाऱ्यांच्या क्रीडा गणवेश भत्ता (Kit Allowance) मध्ये वाढ करण्याबाबत.

संदर्भ : तत्कालीन म.रा.वि.मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. १४२ दि.१९/०४/१९९४.

**********

संदर्भीय प्रशासकीय परिपत्रकान्वये अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडास्पर्धेत सहभागी होणाऱ्या तत्कालीन म.रा.वि.मंडळातील खेळाडू कर्मचाऱ्यांना रु. २५०/- या दराने क्रीडा गणवेश भत्ता (Kit Allowance) देण्याबाबत सूचना प्रसृत करण्यात आल्या होत्या. मात्र महावितरण कंपनीतील खेळाडू कर्मचारी क्रीडा गणवेश भत्ता (Kit Allowance) मध्ये वाढ करण्याबाबत सातत्याने मागणी करीत असल्याने सदर भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन होता.

२. याबाबत सर्वकष विचारांती मा. व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी संचालक (वित्त) यांचेशी विचारविनिमय करुन अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडास्पर्धेत सहभागी होणाऱ्या महावितरण कंपनीतील खेळाडू कर्मचाऱ्यांना रु. २५०/- ऐवजी इतर सर्व खेळांच्या खेळाडूंकरिता रु. ५००/- (रु. पाचशे मात्र) व क्रिकेट खेळाडूंकरिता रु. ८००/- (रुपये आठशे मात्र) अशा वाढीव दराने क्रीडा गणवेश भत्ता (Kit Allowance) देण्यासाठी मंजुरी दिली आहे.

३. क्रीडा गणवेश भत्ता (Kit Allowance) चे वाढीव दर सन २०१०-११ पासून लागू राहील.

४. प्रशासकीय परिपत्रक क्र. १४२ दि. १९/०४/१९९४ मधील अटी व शर्ती अबाधित राहतील.

किशोर पवार
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे
कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.

प्रत रवाना :
उप कामगार अधिकारी (क्रीडा), औरंगाबाद / वर्धा.

D:\D Drive\kam B on\natya kreeda\GANVESH.DOC